**<u>नियमित दिवाणी दावा क्र.७२/२०२१</u>**
**संजीव विरुध्द कृष्णा**
**CNR:MHSN14-000793-2021**

## <u>नि.क्र. ३२ वरील आदेश</u>

अर्ज वाचला. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. १ व ३ तर्फे सदरचा अर्ज त्यांच्या विरुध्द दावा विना कैफीयत चालविण्याचा झालेला आदेश रद्द होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी हे अशिक्षीत असल्याने व त्यांना कायदेविषयक पुरेसे ज्ञान नसलेने त्यांची कैफियत मुदतीत दाखल करु शकलेले नाहीत. वादीतर्फे सदर अर्जास त्यांचे म्हणणे नि.क्र. ३४ चे पाठीमागे देवून अर्ज फेटाळण्याची विनंती केलेली आहे. प्रतिवादींच्या विरुध्द दावा विना कैफियत चालविण्याचा आदेश रद्द झाल्यास व त्याप्रमाणे प्रतिवादी यांना त्यांचे म्हणणे दाखल करणेस परवानगी दिल्यास न्यायदानासाठी त्याचा उपयोग होणार आहे. प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक असल्याने प्रतिवादी यांच्या विरुध्द दावा विना कैफियत चालविण्याचा आदेश तालुका विधी सेवा समिती, शिराळा यांचेकडे र.रु. २००/- कॉस्ट जमा करण्याच्या अटींवर रद्द करण्यात येतो. प्रतिवादी क्र. १ व ३ तर्फे दाव्यास दिलेली कैफियत व म्हणणे रेकॉर्डवर घेण्यात यावे.

PRITI ASHOK SHRIRAM
Digitally signed by PRITI ASHOK SHRIRAM
Date: 2022.09.30 11:06:00 +0530

शिराळा (**प्रीती अ. श्रीराम**)
दिनांक २९/०९/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा.

## <u>C E R T I F I C A T E</u>

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V. S. Patil |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 29/09/2022 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 29/09/2022 |
| Judgment uploaded on | : | 30/09/2022 |